**MHJN020005722018**

वि.दि.दा.क्र.३१/२०१८
सुमित वि. लक्ष्मण व इतर

## नि.क्र.५७ वरील आदेश.

वादी यांनी निशाणी ५७ वरील अर्ज दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ हया मयत झाल्यामुळे त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणे करिता झालेला विलंब माफ करणे करिता दाखल केलेला आहे.

२. अर्ज वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. ३ अन्नपुर्णाबाई सारजाजी कारंडे हया दि. ११.०८.२०२५ रोजी मयत झाल्या आहे. त्यांच्या मृत्युनंतर त्यांना तीन मुली वारस आहेत. मा. न्यायालयात प्रलंबीत असलेल्या प्रकरणात विहित कालावधीत वारस रेकॉर्डवर घेता आले नाही व त्यामुळे त्यांना ५० दिवसांचा विलंब झालेला आहे.

३. प्रतिवादी क्र. ४ यांनी सदर अर्जावर म्हणणे दाखल केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास ५० दिवसाचा विलंब झालेला आहे. त्यामुळे वादी यांस जास्तीत जास्त कॉस्ट लावण्यात यावी व योग्य तो आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी मा. न्यायालयात केली आहे.

४. सदर प्रकरण हे पुढील सुनावणीसाठी प्रलंबीत आहे. त्यामुळे मयताचे वारस रेकॉर्ड वर घेणे जरुरीचे आहे. प्रतिवादी क्र. ३ यांच्या मृत्यु पश्चात त्यांचे वारस हे आवश्यक पक्षकार असल्याने केवळ वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता झालेल्या विलंबामुळे त्यांचा हक्क व अधिकार डावलता येणार नाही त्यामुळे वादी यांचा अर्ज मंजुर करुन मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे परंतु, वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता

केलेला विलंब या करिता त्यांना आर्थिक दंड करणे देखील तितकेच गरजेचे आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. वादी यांचा निशाणी ५७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ३ चे वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता वादी यांना झालेला विलंब रक्कम रुपये ५००/– इतक्या खर्चासह मंजुर करण्यात येतो.

३. सदरचा खर्च वादी यांनी पुढील तारखेस प्रतिवादी यांना दिल्यास प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस रेकॉर्डवर घेण्याची परवानगी देण्यात येते.

४. वादी यांनी दाव्यामध्ये आवश्यक ती पुर्तता करावी.

ASHVINI PRAVIN DIWAN

Digitally signed by ASHVINI PRAVIN DIWAN
Date: 2026.01.23 16:52:45 +0530

जालना
दि.२३.०१.२०२६

(श्रीमती. ए. पी. दिवाण)
दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
जालना.